महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. यांस सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) निधी वितरीत करण्यास मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक- इमाव-२०१९/प्र.क्र.६३/महामंडळे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २० जून, २०१९

वाचा : १) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१.०४.२०१९.
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. यांचे पत्र क्र.इमाविवि/२०१९-२०/लेखा/८४, दि.०३.५.२०१९ व क्र.इमाविवि/२०१९-२०/लेखा/२२१, दि.१४.६.२०१९.

शासन निर्णय

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे मार्फत इतर मागास प्रवर्गातील लोकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येतात. सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता महामंडळाचे मुख्यालय, तसेच ३६ जिल्हा कार्यालयातील माहे एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या कालावधीमधील कार्यालयीन खर्च भागविण्याकरीता रु.६९,३३,०००/- (रुपये एकोणसत्तर लाख तेहत्तीस हजार फक्त) एवढा निधी खालील अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.
२. व्यवस्थापनावरील खर्च मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने कामकाजात सुसूत्रता आणावी.
३. विविध बाबींवर खर्च केलेल्या रकमांची तपशीलवार माहिती व त्यावर केलेला खर्च याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.
४. कार्यालयीन खर्चात काटकसर करावी.
५. महामंडळाने कर्जाच्या वसुलीचे प्रमाण प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करावेत.
६. सदर बाबीचा निधी उपयोगिता प्रमाणपत्रे तपासण्याच्या अधिन वितरीत करण्यात येत आहे.
७. सदर निधी खर्च करतांना संबंधित अधिकाऱ्यांनी सर्वसाधारण वित्तीय नियम, योजनेच्या अटी व शर्ती, CVC च्या मार्गदर्शक सूचना, CAG निरीक्षणे इ. अनुपालन करून निधीचा विनियोग करावा.
८. संदर्भ क्र. १ येथे नमूद वित्त विभागाच्या शासन परिपत्रकातील सूचना व अटींचे पालन करण्यात यावे.

२. वरील अनुदानाबाबत सह सचिव/ उप सचिव (अर्थसंकल्प), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम आहरित करण्यासाठी, कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), आहरण व संवितरण अधिकारी, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना घोषित करण्यात आले आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांस संवितरीत करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

३. या बाबीवरील खर्च मागणी क्र. झेडजी-३, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०३, मागासवर्गीयांचे कल्याण, १०२, आर्थिक विकास, (०३) स्वयंसेवी संस्थांना सहायक

अनुदान (०३) (०१) महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्ग वित्त व विकास महामंडळाला सहाय्यक अनुदान (अनिवार्य) (२२२५ ई ८५७), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०१ एप्रिल, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारांतर्गत निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२१११३१०२९५२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVINDRA
VASANTRAO
GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3
f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c3
8d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT,
o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA
VASANTRAO GURAV
Date: 2019.06.21 11:30:42 +05'30'

(रविन्द्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) सह सचिव /उप सचिव (अर्थसंकल्प), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्ग वित्त व विकास महामंडळ मर्या., मुंबई.
३) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
५) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
६) वित्त विभाग (कार्यासन व्यय-१४/अर्थोपाय/अर्थसंकल्प-३/साउ) मंत्रालय, मुंबई.
७) सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई.
८) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती (महामंडळे).

*****